दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक २५५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.१५ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# नेरुळ -उरण मार्गावर २०२३ मध्ये रेल्वे धावणार

## ५० वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर उरणकरांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होणार



**दै.रायगड नगरी । उरण**

**मागील वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या उरणकरांच्या स्वप्नांचा मार्ग आता दृष्टीपथात येऊन ठेपला आहे. २७ किमी लांबीचा आणि सुमारे १७८२ कोटी खर्चाच्या नेरुळ-उरण मार्गावरील दुसऱ्या टप्प्यातील खारकोपर ते उरण हा १४.३ किमी लांबीच्या रेल्वे मार्गावरील काम प्रगतीपथावर आहे. सर्वच अडथळे दूर झाल्यानंतर १.२ किमी लांबीचा जासई उड्डाणपूलाच्या रखडलेल्या कामालाही जोरदार सुरुवात झाली आहे.**

नेरुळ-उरण मार्गावरील उरण हे शेवटचे स्टेशन आहे. या शेवटच्या उरण स्टेशनाचे कामही वेगात सुरू आहे. नेरुळ-उरण रेल्वे मार्गावर प्रवासी वाहतूक सुरू करण्यासाठी मध्यरेल्वे प्रशासनाने फेब्रुवारी २०२३ पुन्हा एकदा डेडलाईन दिली आहे. त्यामुळे ५० वर्षांपासून उरणकरांनी रेल्वे सुरू होण्याचे पाहिलेले स्वप्न २०२३ मध्ये सत्यात उतरणार आहे.यामुळे उरणकरांसाठी विकासाचे आणखी एक दालन खुले होणार आहे.

# आ.राजन साळवींची एसीबीकडून साडेचार तास कसून चौकशी



**दै.रायगड नगरी । अलिबाग**

**कोकणात रत्नागिरी जिल्ह्यातील उद्धव ठाकरे गटाचे राजापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजन साळवी हे लाचलुचपत विभागाच्या रडावर आहेत. रायगडमधील अलिबाग येथील -उइच्या कार्यालयात राजन साळवी यांची आज तब्बल साडेचार तास चौकशी करण्यात आली. चौकशीसाठी शक्तीप्रदर्शन करत ते रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथे दाखल झाले होते.**

राजकीय प्रवासादरम्यान आपण संपत्ती जमवून ठेवली असल्याचे लाचलुचपत विभागाला वाटतं आहे. लाचलुचपत विभागाने माहिती भरण्यासाठी सहा फॉर्म दिले आहेत. येत्या २० जानेवारीपर्यंत ही माहिती सादर करावी लागणार आहे. न्याय व्यवस्थेवर आपला पूर्ण विश्वास आहे. या चौकशीमध्ये वादग्रस्त काहीच आढळणार नाही. तक्रार देणाऱ्यांचा भ्रमनिरास होणार आहे, असा दावा आमदार राजन साळवी यांनी माध्यमांसमोर केला. आमदार राजन साळवी हे आज सकाळी साडे अकरा वाजता अलिबाग येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कार्यालयात चौकशीसाठी हजर झाले. यावेळी आमदार राजन साळवी यांच्या समवेत उपस्थित असलेल्या शेकडो शिवसैनिकांनी एसीबी कार्यालयाच्या बाहेर जमून घोषणाबाजी केली. साडेचार तास अधिकाऱ्यांनी आमदार राजन साळवी यांच्यावर प्रश्नांचा भडिमार केला. यामध्ये राजकीय प्रवास, कौटुंबिक व्यवसाय आणि वाढलेल्या संपत्तीबाबत एसीबीच्या अधिकाऱ्यांनी प्रश्न विचारले.

लाचलुचपत विभागाच्या चौकशीला सामोरा गेलो. अधिकाऱ्यांनी मला पत्नी, मुले, माझे दोन्ही भाऊ, त्यांचे कुटुंबीय आणि माझी स्वतःची चौकशी केली. आमच्या व्यवसायाबाबत विचारणा केली. विचारलेल्या प्रश्नांची माहिती लाचलुचपत विभागाकडे सुपूर्द केली आहे. जी माहिती आता देता आली नाही ती माहिती लाचलुचपत विभागाला द्यायची आहे. लाचलुचपत विभागाने मला सहा फॉर्म दिले आहेत. ते सर्व फॉर्म वकिलांच्या मार्फत भरून देण्यात येणार आहेत. मी खरेदी केलेल्या संपत्तीची माहिती लाचलुचपत विभागाला हवी आहे. ती सविस्तर माहिती २० जानेवारीपर्यंत देण्याचे त्यांना कबुल केले आहे. न्याय व्यवस्थेवर माझा पूर्ण विश्वास आहे. मला विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे आणि माहिती मी अधिकाऱ्यांना दिली आहे, अशी माहिती आमदार राजन साळवी यांनी दिली.

# पालकमंत्री उदय सामंत रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे उद्योग मंत्री तथा रायगड जिल्हयाचे पालकमंत्री उदय सामंत हे रायगड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.



गुरुवार दि.१५ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी १.०० वाजता हेलिकॉप्टरने आर.सी.एफ कॉलनी, कुरुळ, अलिबाग, जि.रायगड येथे आगमन व मोटारीने जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड येथे आगमन. दुपारी १.१५ वाजता हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक, स्थळ:- जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग. दुपारी २.०० वाजता, पत्रकार परिषद, स्थळ:- जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग. दुपारी २.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय,रायगड-अलिबाग येथून आर.सी.एफ कॉलनी, कुरुळ, ता.अलिबाग, जि.रायगडकडे प्रयाण. दुपारी २.४५ वाजता आर.सी.एफ कॉलनी, कुरुळ, ता.अलिबाग, जि. रायगड येथून हेलिकॉप्टरने पाली, ता.जि. रत्नागिरीकडे प्रयाण.

# केंद्रीय रेल्वे राज्यमंत्र्यांकडे गाड्यांना कर्जतला पूर्ववत थांबा देण्याचे साकडे

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत रेल्वे स्थानकावर लांब पल्ल्याच्या गाड्या थांबत नसल्याने कर्जत तालुक्यातील तसेच आजूबाजूच्या तालुक्यातील प्रवाशांची गैरसोय होते. विद्यार्थी, चाकरमानी आदी प्रवाशांची खूप गैरसोय होते. या गाड्या थांबव्यात म्हणून भाजपा किसान सेल कोंकण समन्वयक सुनील गोगटे यांनी केंद्रीय राज्य मंत्र्यांची भेट घेऊन कर्जत रेल्वे स्थानकात लांब पल्ल्याच्या गाड्यांना थांबा द्यावा असे साकडे घातले.



कर्जत रेल्वे स्थानकावर कोरोना संकटापूर्वी अनेक लांब पल्ल्याच्या गाड्या थांबत असत मात्र सुरक्षेच्या कारणास्तव त्यातील बहुसंख्य गाड्यांचे थांबे रद्द करण्यात आले होते. आता सारे काही सुरळीत झाले आहे मात्र पूर्वी होते ते थांबे अद्याप सुरू झाले नसल्याने कर्जत तालुक्यातील तसेच आजूबाजूच्या प्रवाशांची गैरसोय होत आहे. केंद्रिय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे कर्जत मधील रेडिसन ब्लु मध्ये खाजगी कार्यक्रमासाठी आले असता भाजपा किसान सेलचे कोंकण समन्वयक सुनील गोगटे यांनी मारुती जगताप, हरिश्चंद्र मांडे, सर्वेश गोगटे यांच्यासह त्यांची भेट घेऊन थांबे पूर्ववत करण्याची विनंती केली. तसेच रेल्वे विषयक अन्य विषयांवरही चर्चा केली.

त्यावेळी रेल्वे राज्यमंत्री दानवे यांनी, 'कर्जत मधील तसेच अन्य भागातील रेल्वे विषयक प्रश्न घेऊन आपण दिल्लीला या तेथे चर्चा करून ते प्रश्न सोडविण्याचा निश्चित प्रयत्न करू.' असा शब्द दिला. 'आम्ही लवकरच दिल्लीला जाऊन रावसाहेब दानवे यांची भेट घेणार आहोत.' असे सुनील गोगटे यांनी सांगितले.

# उरण मधिल १७ ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पदासाठी जोरदार मोर्चेबांधणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या चार दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. त्यामुळे आपल्याच पक्षाचा उमेदवार सरपंच पद-ावर निवडून यावा यासाठी सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जोरदार मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे.

उरण तालुक्यातील १७ ग्रामपंचायतींच्या निवडणुका या रविवार दि १८ डिसेंबर २०२२ रोजी पार पडणार आहेत.१७ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी विविध राजकीय पक्षांचे एकूण ५३ उमेदवार हे थेट जनतेतून सरपंच पदाच्या निवडणुकीच्या माध्यमातून निवडणूकीला सामोरे जाणार आहेत. तर १७ ग्रामपंचायतीच्या १५१ सदस्य पदासाठी ३७१ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत. मतदाना अवघे चार दिवस उरल्याने सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी जोरदार प्रचारात आघाडी घेतली आहे. आप आपल्या पक्षाचा सरपंच पदाचा उमेदवार निवडून यावा यासाठी जनतेला, मतदाराला आश्वासनाची खिरापत वाटण्यास सुरुवात केली आहे. एकंदरीत तालुक्यातील राजकीय वातावरण तापले आहे असेच चित्र पहावयास मिळत आहे.

# किल्ला येथे माती चोरांचा वन विभागाच्या मातीवर डल्ला ; धडक कारवाईत वाहने जप्त

**दै.रायगड नगरी । धाटाव**

रोहा तालुक्यातील किल्ला येथे वन जमिनीचा जागेतून बेकायदेशीर उत्खनन करत असलेल्या माती चोरांवर वन खात्याने धडक कारवाई करत वाहने ताब्यात घेतली आहेत. या कारवाईने किल्ला धाटाव परिसरातील माती चोरांची धाबे दणाणले आहेत.



वन खात्या कडून मिळालेले सविस्तर वृत्त असे की मौजे किल्ला येथे गट नंबर १११ मध्ये केंद्र शासनाच्या परवानगीशिवाय वनेत्तर कामास बंदी मध्ये बेकायदेशीर उत्खनन चालू होते. विशेष म्हणजे हे मातीचोर भलतेच हुशार की. शासकीय खात्यातील शनिवार रविवार या सुट्टीच्या दिवशी माती उत्खनन करतात. त्यामुळे कुणाला थांग पत्ता लागत नाही. रविवार दिनांक ११ डिसेंबर रोजी वन खात्याने किल्ला येथील माती चोरांवर धडक कारवाई करून गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरण भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ३५ (१) (७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे व पुढील तपास उप वनसंरक्षण रोहा अप्पासाहेब निकम व सहाय्यक वनसंरक्षक विश्वजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मनोज वाघमारे वनपरिक्षेत्र अधिकारी करीत आहेत. मागील काही वर्षांपासून असंख्य बेकायदेशीर भरावे वन खात्याच्या अथवा शेतकरी वर्गाचा जमिनीमधून उत्खनन करण्यात आले असून. नाममात्र रॉयल्टी भरून शासनाची फसवणूक करण्यात आली आहे. याची तहसील खात्याने चौकशी करावी. अशी सार्वत्रिक मागणी होत आहे.

# सीकेटी महाविद्यालयाची प्रिया चौधरी चमकली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर स्वायत्त महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रिया चौधरी हिने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत संसदेत उत्कृष्ट भाषण करत आपल्या वक्तृत्व शैलीने छाप सोडली. तिने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य एस. के. पाटील, प्राध्यापक एस. एन. तरकाळे उपस्थित होते.

दिल्ली येथे संसद सचिवालयाकडून 'राष्ट्रीय नेत्यांना पुष्पांजली' या राष्ट्रीय वक्तृत्व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने एन. एस. एस. विभागाकडून देशभरातील २५ प्रतिनिधींची निवड करण्यात आली होती. त्यामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या चांगू काना ठाकूर स्वायत्त महाविद्यालयातील विज्ञान शाखेची विद्यार्थिनी प्रिया शेषनाथ चौधरी हिची महाराष्ट्राची प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली होती. प्रिया चौधरी हिने अनेक जिल्हा व राज्यस्तरीय वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धेत सहभाग घेऊन यश प्राप्त केले आहे. त्या नुसार संसद सचिवालयाकडून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात तिला आमंत्रित करण्यात आले होते व त्या अनुषंगाने तिचा प्रवास आणि राहण्याची व्यवस्था संसद सचिवालयाकडून करण्यात आली होती. यावेळी तिने महाराष्ट्राचे नेतृत्व करत आपल्या वक्तृत्वातून उपस्थितांची मने जिंकली. अत्यंत समर्पक मांडणी सादर करून आपल्या भाषणा-तून तिने राष्ट्रीय नेत्यांना पुष्पांजली अर्पण केली. तिच्या बहारदार वक्तृत्वाबद्दल सर्वांनी भरभरून कौतुक केले.



# अवकाळी पावसाने उडाली खालापूरकरांची तारांबळ

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहरासह खालापूर तालुक्यात अचानक झालेल्या अवकाळी पाऊसाने नागरिकांची चांगलीच दाणादाण उडाली आहे. गेल्या दोन-तीन दिवसापासून ढगाळ वाता-वरण निर्माण झाले होते. यापूर्वीच बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या 'मिंडोस' चक्रीवादळामुळे किनारपट्टीवरील रायगडसह काही जिल्ह्यांत जोरदार पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली होती.

दि. १० ते १४ डिसेंबर या काळात वादळी वाऱ्यासह ढगांच्या गडगडाटात पाऊस बरसण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. दरम्यान, आज बुधवार, दि. १४ डिसेंबर रोजी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. दुपारच्या सुमारास अचानक जोरदार पावसाला सुरुवात झाली. अचानक आलेल्या पावसामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. विजांच्या कडकडाटांसह कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे जागोजागी रस्त्यांवर पाणी साचले होते. दरम्यान, ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रचारालाही या अवकाळी पावसाचा फटका बसला असल्याचे दिसून आले. प्रचारासाठी निघालेल्या रॅलीतील कार्यकर्त्यांची अचानक आलेल्या पावसामुळे चांगली तारांबळ उडाली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आगामी ३-४ दिवस असेच वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता असून पाऊसधारा बरसण्याचीही शक्यता आहे, वर्तविण्यात आली आहे. दरम्यान, या पावसामुळे मात्र खोपोली शहर व परिसरातील थंडी गायब झाल्याचे दिसून येत आहे.

# गोवर-रूबेलाच्या सर्वेक्षणासाठी महापालिकेचे विशेष नियोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेच्यावतीने ११ खासगी रूग्णालयांची गोवर-रूबेलाच्या उपचारासाठी खास मदत करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली असून, उद्या दिनांक १५ डिसेंबरपासून ते २५ डिसेंबरपर्यंत नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थी, आशा वर्करर्स, एएनएम, जीएनएम मदतीने गोवर-रूबेलाचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येणार असल्याचे आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी सांगितले.

आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आज मुख्यालयामध्ये गोवर - रूबेलाच्या सर्वेक्षणासाठी महापालिकेचे विशेष नियोजनासाठी बैठक आयोजित करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. उपायुक्त सचिन पवार, प्रभारी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ. पंडित, डॉ.भोईटे, डॉ.चांडक यांच्याबरोबर सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकिय अधिकारी, सिटी टास्क फोर्स सदस्य, आशा वर्कर, एएनम, जीएनम, पालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकित जागतिक आरोग्य संघटनचे विशेष समन्वयक डॉ. अरुण काटकर यांनी उपस्थितांना 'गोवरवरील प्रतिबंधात्मक उपाय योजना यावरती मार्गदर्शन केले. तसेच उपस्थित सिटी टास्क फोर्सच्या सदस्य मान्यवर डॉक्टरांनी महापलिकेला गोवर -रूबेलाच्या उपाययोजनेमध्ये सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच आपल्या सूचनाही सांगितल्या.

पनवेल कार्यक्षेत्राच्या आसपास गोवर -रूबेलाचे रूग्ण सापडत असल्यामुळे पनवेल कार्यक्षेत्रात येणाऱ्या गोवर- रूबेलाच्या रूग्णांच्या पार्श्वभूमीवर गोवर रूबेला निर्मूलनासाठी करावयाची उपाययोजना यावरती या बैठकित चर्चा करण्यात आली. गोवरवरती लसीकरण हा प्रभावी उपचार असून त्यादृष्टीने लसीकरणाचा वेग वाढविणे तसेच गोवरचे संशयित शोधण्यासाठी नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रनिहाय रोज १५० टिमच्या साहाय्याने घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. आशा वर्करर्स, एएनएम ,जीएनएम यांनी योग्य तऱ्हेने सर्वेक्षण करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. या सर्वेक्षणासाठी महापालिकेने खास स्टीकर्स छापले असून सर्वेक्षण झालेल्या घरांवरती हे स्टीकर्स लावण्यात येणार आहेत. गोवर -रूबेलाच्या उपाययोजनेसाठी सामाजिक संस्थानी महापालिकेला मदत करावी असे आवाहन यावेळी उपायुक्त सचिन पवार यांनी केले. तसेच या उपाययोजनेमध्येमहापालिकेच्यावतीने प्रसारमाध्यमांचा वापर करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



# नव्या कुरापतींचा इशारा

गलवान खोऱ्यातील भारत आणि चीन यांच्या संघर्षाला अडीच वर्षे झाली आहेत. त्यानंतर आता चीनने गेले दहा दिवस अरुणाचल प्रदेशाच्या तुलुंग-ला या सीमावर्ती भागात 'प्रत्यक्ष ताबा रेषा' बदलण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी संसदेत केलेल्या निवेदनानुसार एकही भारतीय जवान गंभीर जखमी झाला नसून एक इंचही भारतीय भूमी चीनने बळकावलेली नाही. त्यांच्या म्हणण्याचा अर्थ, जे चिनी सैनिक ताबा रेषा ओलांडून आले होते, त्यांना परत पिटाळण्यात भारतीय सैन्यदलाला यश आले आहे. तुलुंग-ला येथील ही चकमक शस्त्रांविना होती. जवळपास तीनशे चिनी सैनिकांनी दगडफेक करून घुसखोरी केली. मात्र, चीनने ही नवीच आघाडी उघडलेली नाही, हे लक्षात ठेवायला हवे. यंदाच चीनच्या आक्रमणाला सहा दशके झाली आहेत. मात्र, त्या आक्रमणानंतरही चीनने सीमेवर सातत्याने कटकटी केल्या आहेत आणि १९६२ नंतर छोट्या छोट्या कुरापती काढून थोडा थोडा भारतीय प्रदेश काबीज करायचा, अशी चीनची रणनीती राहिली आहे. १९७५ मध्ये याच तुलुंग-ला भागात दोन्ही सैन्यांची सशस्त्र चकमक उडाली होती. तेव्हा चीनने आसाम रायफल्सच्या चार जवानांचे अपहरण करून त्यांचा निर्दयी छळ केला आणि त्यांना मारून टाकले. कर्नल बी. आर. शहा यांनी तेव्हा हे मृतदेह भारताच्या वतीने ताब्यात घेतले, तेव्हा हा छळ किती भयानक होता, याची कल्पना आली. त्यामुळे, चीन सीमेवर काही नवीन करीत नाही. मात्र, चीनला मिळणाऱ्या प्रतिसादामध्ये गेल्या काही वर्षांमध्ये वाढता निर्धार आणि ठामपणा दिसतो आहे. कदाचित, त्यामुळेच हा ताजा संघर्ष संपल्यानंतर चीनने काढलेल्या पत्रकात किंचित मवाळ सूर लावला आहे. दोन्हीकडच्या वरिष्ठ सैन्याधिकाऱ्यांची बैठकही पार पडली आहे. भारत आणि चीन सीमेवर प्रचंड मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभ्या करण्याची गरज होती आणि ते काम आता वेगाने चालू आहे, असे दिसते. दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी यांनाही सादर झालेल्या तत्कालीन अभ्यास अहवालांमध्ये या सीमेवरच्या पायाभूत सुविधांची निकड स्पष्ट नमूद करण्यात आली होती. भारताच्या बाजूने रस्ते, कायमस्वरुपी सैन्यतळ आणि इतर सुविधा वाढतील, त्या प्रमाणात चीनची अस्वस्थता वाढत जाणार, हे उघड होते. याचे कारण, कोणतीही खोडी काढली तर आता तिला प्रत्युत्तर मिळते आहे. मात्र, चिनी लाल सैन्याने हातात दगड किंवा रायफली घेऊन खोडी काढूच नये, इतकी दहशत अजून निर्माण झालेली नाही. तीही आज ना उद्या करावी लागेल. चिनी वृत्तसंस्थांनी 'भारतीय सैन्यानेच सीमा ओलांडली' असे आता म्हटले आहे. कम्युनिस्ट राजवटीचा विक्रम करणारा चीन दुसरे काय म्हणणार? प्रत्यक्षात सध्या ज्या चकमकी होत आहेत, तोही सगळा भूभाग चीनने एकेकाळी हडपलेला आहे. चिनी घुसखोरीच्या विरोधात अरुणाचल प्रदेशात पुन्हा निघालेले मोर्चे ही विशेष नोंद घेण्याजोगी घटना आहे. जग त्यांची योग्य ती दखल घेईल. एकीकडे, सामान्य नागरिक असे रस्त्यावर उतरत असताना सगळ्या राजकीय पक्षांचा आणि नेत्यांचा सूर संवादी नसावा, ही खटकणारी गोष्ट आहे. गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेच्या बाहेर 'राजीव गांधी प्रतिष्ठान'ला चीनकडून मिळालेल्या देणग्यांचा जो उल्लेख केला, तो खरा असला तरी सरकार आणि काँग्रेस यांच्यातील अंतर वाढविणारा होता. मोदी सरकार आल्यापासून चीनने भारताचा काही भूभाग बळकावला आहे आणि सरकार ते लपवत आहे, असा आरोप विरोधक सातत्याने करीत आहेत. सरकार तो अर्थातच फेटाळत आहेत. मात्र, तो फेटाळताना आता १९६२ मधील पराभवाची आठवण काढून त्यासाठी काँग्रेस आणि नेहरू सरकारला दोषी ठरविण्याने आज काय साधते? उलट, १९६२ नंतर भारताला एक नवी जाग आली आणि तिचे प्रत्यंतर पुढच्या नऊच वर्षांत १९७१ मध्ये आले. गेल्या दोन दशकांमध्ये भारत-चीन सीमेवर मोठ्या प्रमाणात कामे होत आहेत. मोदी सरकार आल्यानंतर हा वेग बराच वाढला. दरम्यान भारताची आर्थिक ताकदही व जगातील स्थानही वाढले आहे आणि भारताला आपण पूर्वीसारखे नमवू शकत नाही, याचे योग्य ते भान चीनला आले आहे. असे असले तरी एकीकडे पूर्व आणि उत्तर सीमा आणि दुसरीकडे पश्चिम सीमा या पुढची अनेक वर्षे अशांत राहणार आणि असे छोटेमोठे संघर्ष करीतच भारताला वाटचाल करावी लागणार आहे. चीनचा सीमेवरील आक्रमक पवित्रा किंवा भारताच्या सभोवताली आपल्या मित्र देशांची माळ तयार करण्याचा प्रयत्न यातून हेच दिसते. मात्र, गलवानचा संघर्ष किंवा आत्ताचा अरुणाचलच्या सीमेवरील संघर्ष हा भारताची नवी ठाम भूमिका आणि नवी तयारी दाखविणारा आहे. अशावेळी, पक्षभेद आणि मतभेद विसरून राष्ट्रीय सुरक्षा या विषयावर तरी सर्वांनी एका सुरात बोलायला हवे.

# जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनासाठी आपदा मित्रांच्या पहिल्या ५० जणांच्या तुकडीचे आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,नवी दिल्ली यांच्याकडून राज्यातील २० जिल्ह्यामध्ये आपदा मित्रांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या पुढाकाराने रायगड जिल्ह्यातून ३०० आपदा मित्रांच्या प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. त्यापैकी पहिल्या ५० जणांच्या तुकडीचे १२ दिवसांच्या प्रशिक्षण वर्गास काल दि.२३ डिसेंबर २०२२ रोजी महाड येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह चवदार तळे येथे सुरु झाले. याचे उद्घाटन महाड प्रांताधिकारी श्रीमती प्रतिमा पुदलवाड यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी महाड तहसिलदार सुरेश काशिद, नायब तहसिदार काशिनाथ तिरमिळे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, नागरी संरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक शशिकांत शिरसाट, काशिनाथ कुरकूटे, समाधान कडू, गणेश पाटील यांची उपस्थिती होती.

रायगड जिल्ह्यात नैसर्गिक व मानव निर्मित आपत्तींमध्ये होत असलेली वाढ पाहता अशा प्रकारच्या आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचे महत्व अनन्यसाधारण आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून आपदा मित्रांना आपत्ती व्यवस्थापनाचे, आपत्तीकाळात व आपत्तीनंतरच्या काळात करावयाच्या उपाययोजना व मदतकार्याविषयीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. वय वर्षे १८ ते ४० असलेल्या या प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित करण्यासाठी हे तब्बल १२ दिवसांचे निवासी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणार्थींना लाईफ जॅकेट, बॅटरी, दोरखंड तसेच आपत्ती व्यवस्थापनांतर्गत मदतकार्यासाठी आवश्यक असणाऱ्या इतर वस्तूंचे एकत्रित किट देण्यात आले आहे.

आपदा मित्रांनी प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांना प्रशिक्षण प्रमाणपत्र दिले जाणार असून त्यांचा रक्कम रू.५ लाखाचा अप-घाती विमा उतरविण्यात येणार आहे.

# ऐतिहासिक वास्तूंच्या संवर्धनासाठी जिल्हा वार्षिक योजनेत तीन टक्के निधी राखीव : ना.सुधीर मुनगंटीवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील गड-किल्ले, मंदिरे व महत्वाची संरक्षित स्मारके इत्यादींच्या संवर्धनासाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत आर्थिक वर्ष २०२३-२४ पासून पुढील तीन वर्षासाठी ३ टक्के निधीची तरतूद करण्यासाठी शासन मान्यता देण्यात आली आहे.

याबाबतचा शासन निर्णय नियोजन विभागाने १४ डिसेंबर २०२२ रोजी निर्गमित केला आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने नियोजन विभागाने हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्राच्या पुरातन व सांस्कृतिक परंपरेचे व वारशाचे जतन करण्यासंदर्भात घेतलेल्या या निर्णयाबद्दल सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री तथा नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त केले आहेत. या निर्णया अंतर्गत तीन वर्षात एक हजार कोटी रुपये निधी उपलब्ध होणार आहेत.

महाराष्ट्राला प्राचीन सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या असून, त्यात कातळात खोदलेल्या जागतिक वारसा म्हणून सुप्रसिध्द अशा अजिंठा-वेरुळ लेण्या, रायगड व सिंधुदुर्ग यासारखे किल्ले, यादव व मराठा काळात उभी राहिलेली व सुंदर शिल्पाकृतींनी नटलेली गडचिरोली जिल्ह्यातील श्री मार्कंडेय व श्री त्र्यंबकेश्वर यासारखी मंदिरे, चंद्रपूर, बल्लारपूर येथील किल्ले, राजुरा येथील श्री सिध्देश्वर मंदिर, भद्रावती येथील विजासन लेणी, मध्ययुगीन दर्गे व मकबरे तसेच वसाहत कालीन स्थापत्यांचा समावेश आहे. ऐतिहासिक व प्राचीन स्मारकांपैकी केंद्र सरकारद्वारा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मार्फत २८८ स्मारके राष्ट्रीय महत्वाची म्हणून जतन केली आहेत. तसेच, महाराष्ट्र राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागाने पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत ३८७ स्मारके संरक्षित म्हणून घोषित केलेली आहेत. यामध्ये घटोत्कच व धाराशीव ही लेणी, राजगड, सिंहगड, माणिकगड यांच्यासारखे किल्ले तसेच गड जेजूरी, निरानृसिंहपूर, श्री तुळजाभवानी यांसारखी मंदिरे, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर आदी महापुरुषांची जन्मस्थळे व गेट वे ऑफ इंडिया अशा स्मारकांचा समावेश आहे. राज्यस्तरीय योजनांमध्ये सर्व संरक्षित स्मारकांचे संवर्धन करण्यासाठी उपलब्ध असलेला निधी कमी असल्याने, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदर्भात सांस्कृतिक कार्य मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांना यापूर्वी विनंती केली होती, तर उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांची भेट घेतली होती. या संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाकडून निर्गमित करण्यात येणार आहेत.

# इतर मागासवर्गीय घटकांना न्याय देण्यास कटिबध्द : महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

भारतीय संविधानाने समाजातील दुर्बल घटकांना सबल घटकांच्या बरोबरीने विकासाची संधी दिली आहे. याच अनुषंगाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राज्य शासनाने काय उपाययोजना कराव्यात, याचा अभ्यास व परिक्षण करुन याविषयीची माहिती दोन्ही सभागृहांना सादर करण्यास महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग कटिबध्द आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य ॲड.बालाजी किल्लारीकर(उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ) यांनी आज येथे केले. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य रायगड जिल्हा दौऱ्यावर आले असून जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य श्री. ज्योतीराम चव्हाण (निवृत्त सहसचिव,मंत्रालय), जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जेराव म्हस्के-पाटील, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त सुनिल जाधव, जातपडताळणी समिती, रायगड उपायुक्त श्री.वासुदेव पाटील, संशोधन अधिकारी रविकिरण पाटील व विविध शासकीय विभागांचे कार्यालयप्रमुख उपस्थित होते.

या बैठकीत रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, पनवेल महानगरपालिका, खोपोली, अलिबाग, महाड, पेण, रोहा, उरण, मुरुड जंजिरा, श्रीवर्धन,माथेरान व कर्जत नगरपरिषदा तसेच तळा, पोलादपूर, माणगाव, खालापूर नगरपंचायत, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई व त्यांच्या अधिनस्त असलेली कार्यालये, जलसंधारण व मत्स्यविकास विभाग, कृषी व पशुसंवर्धन विभाग, जिल्हा जाती प्रमाणपत्र समिती या कार्यालयांमधील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग प्रवर्गातील अधिकारी/




कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेषाबाबत व इतर कल्याणकारी योजना याबाबत संबंधित अधिकाऱ्यांबरोबर सविस्तर चर्चा करुन आढावा घेण्यात आला. यावेळी विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग प्रवर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांबाबतीत कल्याणकारी योजना राबविताना तांत्रिक व प्रशासकीय कोणत्या अडचणी येतात, सर्व शासकीय कार्यालयांमध्ये मागासवर्गीयांच्या कल्याणाच्या दृष्टीने नियमांनुसार बिंदू नामावली, रोस्टर अद्ययावत करण्यात आले आहे किंवा कसे, अनुकंपा तत्व-ावरील नियुक्तीबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात आली आहे किंवा कसे अशा विविध प्रशासकीय बाबींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली.

संसदीय लोकशाही पध्दतीमध्ये विविध आयोग प्रशासनावर संपूर्ण व प्रभावी नियंत्रण तसेच देखरेख ठेवण्याची भूमिका पार पाडीत असतात. शासनाने राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास करुन त्यातील त्रुटी शोधून त्या अधिक परिणामकारक व समाजाच्या शेवटच्या थरापर्यंत कशा पोहोचविता येतील, याबाबत आयोग आपल्या अहवालामार्फत विधीमंडळाकडे शिफारशी करते. महाराष्ट्र राज्य हे देशातील एक प्रगतशील राज्य असून शासनामार्फत कार्यान्वित केलेल्या योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे होते किंवा कसे, मागासवर्गीयांना शैक्षणिक व वैधानिक संस्था तसेच अन्य क्षेत्रात पर्याप्त प्रतिनिधीत्व किंवा संधी मिळते किंवा नाही, शासकीय पातळीवर अंगीकृत केलेल्या धोरणांची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची पडताळणी करण्यासाठी तसेच मागासवर्गीयांना सर्व क्षेत्रात पर्याप्त समान संधी उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत उपाययोजना सूचविण्यासाठी हा आयोग कार्य करतो. बैठकीच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे सदस्य ड.श्री.बालाजी किल्लारीकर (उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ) आणि श्री.ज्योतीराम चव्हाण (निवृत्त सहसचिव,मंत्रालय), यांचे पुष्पगुच्छ व छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याची प्रतिकृती, जिल्हा प्रशासनाची कार्यपुस्तिका आणि रायगड प्रशासनाने प्रकाशित केलेले समग्र रायगड हे कॉफीटेबल बुक देवून स्वागत केले.

यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, पनवेल महानगरपालिका, जिल्हा परिषद व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, मुंबई व त्यांच्या अधिनस्त असलेली कार्यालये, जलसंधारण व मत्स्यविकास विभाग, कृषी व पशुसंवर्धन विभाग, जिल्हा जाती प्रमाणपत्र समिती या कार्यालयांमधील मागासवर्गीय प्रवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्या भरती, बढती, आरक्षण, अनुशेषाबाबत व इतर कल्याणकारी योजनांबाबत कशा प्रकारे कार्यवाही केली जात आहे,याबाबत महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या सदस्यांस संगणकीय सादरीकरणाद्वारे माहिती दिली. या बैठकीस जिल्हाधिकारी कार्यालयातील इतर अधिकारी, मुख्याधिकारी, विविध शासकीय विभागांचे कार्यालयप्रमुख उपस्थित होते.

# फोर्टी प्लस क्रिकेटच्या अजिंक्यपदी मॉर्निंग स्टार संघ

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुका फोर्टी प्लस क्रिकेट संघटनेच्या क्रिकेट स्पर्धेचे अजिक्यपद कर्जत मधील मॉर्निंग स्टार क्रिकेट संघाने जिंकले उपविजेतेपद खालापूरच्या धाकटी पांढरी क्रिकेट संघाने जिंकले. या स्पर्धेत १२ संघांनी सहभाग घेतला होता.

कर्जत तालुका फोर्टी प्लस क्रिकेट संघटनेच्या वतीने क्रिकेट स्पर्धेचे आयोजन मालवाडी येथील क्रीडा संकुलाच्या मैदानावर करण्यात आले होते. यास्पर्धेत कर्जतच्या मॉर्निंग स्टार क्रिकेट संघाने गत विजेच्या खालापूरच्या धाकटी पांढरी क्रिकेट संघाचा पराभव करून विजेते पद पटकावले.या स्पर्धेत मालिकावीर म्हणुन मॉर्निंग स्टार संघाचा प्रभाकर देशमुख, उत्कृष्ट फलंदाज म्हणून धाकटी पंढरी संघाचा प्रविण देशमुख, उत्कृष्ट गोलंदाज म्हणून धाकटी पंढरी संघाचा रमेश ठोंबरे व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून मॉर्निंग स्टार संघाचा बाळा धनवे यांची निवड करण्यात आली.

पारितोषिक वितरण समारंभाच्या प्रसंगी संघटनेचे अध्यक्ष शशांक शेट्टी, कार्याध्यक्ष दिनेश कडू यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कर्जत मधील ज्येष्ठ क्रिकेटपटू श्रीकांत (भाई) मनोरे व द्वितीय पारितोषिक उद्योजक विश्वनाथ थोरवे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. याप्रसंगी अभिनेता राहुल वैद्य, माजी नगरसेविका श्रावणी मनोरे, माजी नगरसेवक प्रवीण गांगल, मधुकर सुर्वे, महेंद्र निगुडकर, मेघा परुळेकर, वर्षा लाड, गिर्यारोहक संतोष दगडे, उद्योजक विश्वनाथ थोरवे, राजाभाऊ कोठारी, मुख्याध्यापक विष्णू साबळे आदी उपस्थित होते. पंच म्हणून प्रशांत शिंदे, जयवंत पिंगळे, दीपक राणे, समीर चव्हाण काम पाहिले. स्पर्धेचे समालोचन राजाभाऊ कोठारी आणि योगेश ढोले यांनी केले. याप्रसंगी शिरीष दिघे, विराग फाटक, विनायक परांजपे, महेंद्र निगुडकर , गजेंद्र दांडेकर, दीपक राणे, भाई जाधव आदी उपस्थित होते.



# खामगाव येथील १५ वर्षीय शाळकरी मुलीला फुस लावून पळविले

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

म्हसळा तालुक्यातील खामगाव वाडी येथून १५ वर्षीय शाळकरी मुलीला फुस लावून पळविल्याच्या घटनेची नोंद म्हसळा पोलीसांत १३६/२०२२ भा.दं. वि.कलम ३६३प्रमाणे रोजी करण्यात आली आहे.

मुलीच्या आईने फिर्याद दिली असता गुन्हा नोंदविण्यात आल्याचे पोलीस सूत्रानी सांगितले. घोसाळकर हायस्कूलची १५ वर्षीय शाळकरी मुलगी शाळेच्या युनी फॉर्म व सॅकसह (दप्तर) ११ ते १२ च्या दरम्यान खामगाव येथून कणघर येथील २० वर्षीय युवकाने फुस लावून पळविण्याची नोंद पोलीसांत केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सपोनी संदीपान सोनावने यांच्या मार्गदर्शनाखाली मपोसई वाय.पी.बांडे. करीत आहेत.

# कर्जत तालुक्यातील एकसळ येथील विविध कामांचे भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मतदार संघाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या विशेष प्रयत्नातून कर्जत तालुक्यातील एकसळ येथील विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

तालुक्यातील एम एम आर डी ए च्या माध्यमातून सुमारे २ कोटी रुपये खर्च करून चिंचवली एकसळ रस्ता तयार करणे, एम एम आर डी ए च्या माध्यमातून १ कोटी २० लक्ष रुपये खर्च करून एकसळ भाणसोली रस्ता तयार करणे, जलजीवन मिशन मधुन ६२ लक्ष रुपये खर्च करून एकसळ येथे नळ पाणी पुरवठा योजना तयार करणे. या कामाचे भूमिपूजन आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते संपन्न झाले,

यापप्रसंगी संतोष भोईर, संभाजी जगताप, शरद ठाणगे, रत्नाकर बडेकर आदी सह तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व एकसळ ग्रामस्थ उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खाली सविस्तरपणे नमूद केलेली मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकांकडून कायम खरेदी करण्याचे निश्चित ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिसार्वे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| जमीन मालकांचे नांव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| दर्शन लहू पाटील<br>देवयानी संतोष पाटील<br>प्रमोद लहू पाटील<br>बेबीबाई लहू पाटील | १४०/३ | ०-६१-५०<br>पैकी ०-२९-९० | ४.२७ |

वर नमूद मिळकतीचे एकूण क्षेत्रापैकी ०-२९-९० हे.आर.चौ.मी. इतके क्षेत्र हा या नोटीशीचा विषय आहे.

तरी सदरहू वर नमूद मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.१२/१२/२०२२

सही/-
**सुवर्णा म. वत्सराज**
**ॲडव्होकेट, पनवेल**

**पत्रव्यवहाराचा पत्ता : फ्लॅट नं.३०४, आदित्य विहार को.ऑप.हौ.सो. लि. महात्मा फुले रोड, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ मोबा नं.९८३३६३९०४१**



**अर्जदारातर्फे वकील : अनंत देवजी पाटील**

## जाहीर नोटीस

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात
मो.अप.क्लेम.नं.१६०/२०२२
नि.नं.१४/ड
ने.ता.१७/०१/२०२३

शारदा शरद गोवर्धने वगैरे १ — अर्जदार
विरुद्ध
सेगल शिपिंग सर्व्हिसेस प्रा.लि.
दि न्यू इंडिया एन्श्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,
सामनेवाला नं.१) सेगल शिपिंग सर्व्हिसेस प्रा.लि.
वय वर्षे, धंदा : व्यवसाय
ऑफिस नं.४०३, बालाजी कॉम्प्लेक्स,
प्लॉट नं.१२, १३, सेक्टर ०८/ई,
कळंबोली, ता.पनवेल,
जि.रायगड महाराष्ट्र ४१०२१८

दि.३१/०५/२०२२ रोजी सायंकाळी ४.४५ वाजण्याच्या सुमारास शहाबाज गावचे हद्दीत, अलिबाग-पेण रोडवर फौजे धाब्याच्या पुढे व धरमतर पुलाचे अलिकडे, पोयनाड पोलीस स्टेशन, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या हद्दीत अपघात घडला. सदर अपघातामध्ये अर्जदार नं.१ यांचे पती आणि अर्जदार नं.२ यांचे वडील शरद बाळू गोवर्धने हे मयत झालेले आहेत. सदर अपघतामध्ये ट्रेलर क्र.एमएच ४६/बीएम ९९३२ वरील चालक राजेशकुमार रामफेर वर्मा हा शरद बाळु गोवर्धने यांच्या मरणास कारणीभूत ठरले आहेत.

म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता रु.१२,००,०००/- चा नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.१७/०१/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०८/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड-अलिबाग**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय**
**रायगड-अलिबाग**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे सिटबेल्ट न लावणाऱ्या वाहनचालकांना गुलाबपुष्प देऊन करण्यात आली जनजागृती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

चार –चाकी वाहने चालवताना वाहतुकीच्या नियमाबरोबरच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सिटबेल्ट लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु अनेक चारचाकी वाहन चालक याकडे दुर्लक्ष करून नियम धाब्यावर बसवतात त्याचबरोबर आपला जीव सुद्धा धोक्यात घालतात. या पार्श्वभूमीवर पनवेल शहर वाहतूक शाखेच्यावतीने सिटबेल्ट जनजागृती अभियान नवीन पनवेल उड्डाणपुलाजवळ घेण्यात आले.

चारचाकी वाहनांमध्ये प्रवास करीत असताना वाहन चालक आणि बाजूच्या सीटवरील प्रवाशाने सीट बेल्ट लावणे क्रमप्राप्त आहे. यासंदर्भात वाहतुकीचे नियम सुद्धा आहे. अशाप्रकारे सिटबेल्ट न लावणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलीस त्याचबरोबर आरटीओकडून दंडात्मक कारवाई केली जाते. त्यातून मोठ्या प्रमाणात दंडही वसूल होतो. असे असतानाही काही वाहन चालक या नियमाचे पालन करीत नाहीत . सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सिटबेल्ट लावणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे अपघातात अनेकदा वाहन चालकाचा प्राण वाचतो. दुर्दैवाने रस्त्यावर दुर्घटना घडली. आणि संबंधित वाहन चालकाने सिटबेल्ट लावला असेल तर त्याच्यातून तो बचावल्याची अनेक उदाहरणे आहेत. सुरक्षितेचा दृष्टिकोनातून सिटबेल्ट अत्यंत उपयुक्त आणि उपकारक आहे. अनेक वाहनांच्या सिटबेल्ट शिवाय अपघात कालीन परिस्थितीत एअर बॅग ओपन होत नाहीत. जर बेल्ट लावला असेल तरच त्या बाहेर येऊन फुटतात. परिणामी वाहनातील प्रवाशांचा प्राण वाचतो. या सर्व पार्श्वभूमीवर सिटबेल्ट लावूनच वाहने चालवण्याबाबत परिवहन आणि पोलीस यंत्रणेकडून वारंवार आवाहन केले जाते. त्यानुसार पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे नवी मुंबई पोलीस आयुक्त व पोलीस उपायुक्त तसेच पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनानुसार सिटबेल्ट अभियान राबाविण्यात आले. यावेळी नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनचालकांना गुलाबपुष्प देण्यात आले. यावेळी पोलिस उपनिरीक्षक जाधव , पोलिस नाईक खैरावकर ,पोलिस हेड कॉन्स्टेबल बागल, महिला पोलिस कॉन्स्टेबल जाधव यांच्यासह पोलीस अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पनवेल शहरासह ग्रामीण भागात लवकरच पाण्याचे मीटर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल शहर व २९ गावांमध्ये लवकरच पाण्याचे मीटर लागणार आहेत.यासंदर्भात लवकरच पालिकेच्या पाणीपुरवठा विभागामार्फत निविदा काढण्यात येणार असून याकरिता सुमारे १८ कोटींचा खर्च येणार आहे.अमृत योजनेअंतर्गत या कामाला मंजुरी देखील मिळाली आहे.

पनवेल शहर व ग्रामीण भागात हे मीटर लागणार आहेत. सध्याच्या घडीला पाणीपुरवठा करताना नागरिकांकडून सरासरी नुसार पाण्याचे वार्षिक बिल आकारले जाते.विशेष म्हणजे पाणीपुरवठा करीत असताना चोख मोजमाप यामुळे होत नाही.यामध्ये अधिक सुसूत्रता येणार असून प्रत्येक कनेक्शन मागे पाणी मीटर लागणार असल्याने पाण्याचा वापर देखील काटकसरिने होणार आहे.पनवेल महानगरपालिकेच्या वतीने काही ठिकाणी नव्याने पाणी जोडणी देण्यात आली आहे.यामुळे अशाठिकाणी हे मीटर लागणार आहेत.पनवेल महानगरपालिकेच्या सर्वेक्षणानुसार जवळपास ११५६९ मीटर नव्याने बसविले जाणार आहेत. यामुळे जेवढे पाणी वापरण्यात येईल तेवढेच पाण्याचे बिल या रहिवाशांना भरावे लागणार आहे.अमृत योजनेअंतर्गत सुमारे ४३८ कोटींचा निधी पनवेल महानगरपालिकेला प्राप्त होणार आहे.यामुळे ग्रामीण भागात विविध कामे मार्गी लागणार असल्याचे आयुक्त गणेश देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.ग्रामीण भागात पाण्याच्या टाक्या,मलनिस्सारण वाहिन्या आदींची कामे यामुळे मार्गी लागणार असून ग्रामीण भाग व शहरी भागातील दरी दूर होणार असल्याचे आयुक्त गणेश देशमुख यांनी स्पष्ट केले आहे.पनवेल शहर आणि ग्रामीण भागात मीटर लावण्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत.यासंदर्भात टेंडर प्रक्रिया देखील अंतिम टप्प्यात असल्याची माहिती पाणीपुरवठा अधिकारी विलास चव्हाण यांनी दिली.


# आरोग्य तपासणी शिबिराला उत्तम प्रतिसाद ; ४५/५० रूग्णांनी घेतला लाभ

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरात प्रथमच डॉक्टर मेडीकल असोशिएशन यांच्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जवळपास ५० रूग्णांनी तपासून लाभ घेतला. या शिबिराचे मुख्य डॉ.अपुर्व भट(रोहा) यांनी करून तालूका डोंगराळ दुर्गमभागात असून वैद्यकिया दृष्ट्या मागे असल्याने विविध आजारांची तळा–गाळातील रुग्णांसाठी आजाराची माहिती व्हावी. व वेळीच उपचार करावा गंभीर आजारांपासून रोखावे या उदात्त उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये अपेंडिक्स, गॅलोब्लेंडर, पोटातील गाठी, पोटदुखी स्तनाच्या किंवा थायरॉईडचे गाठी, व इतर आजार हर्निया हायड्रोसिलचे आजार, मूत्र विकार, किडनी स्टोन, मुळव्याध, ऍसिडिटी स्तनाचा, तोंडाचा, थायरॉईड कर्करोग अशा विविध आजारावर निदान व सल्ला डॉ.अपूर्व भट (एम् एस. कॅन्सर सर्जन) रोहा यांनी प्रत्यक्ष तपासणी करून सल्ला दीला सदर शिबिरामध्ये तपासणी केल्यानंतर निदान झाल्यावर शस्त्रक्रिया ३१ डिसेंबर २०२२ रोजी डॉ.भट नर्सिंग होम रोहा येथे करण्यात येणार आहेत या मध्ये ५०% सुट देऊन शस्त्रक्रिया केली जाणार असे सांगून रुग्णांना आपल्याला असणाऱ्या गुप्त(अज्ञात) आजारा विषयी सतर्क असणे गरजेचे आहे.

काही असे आजार आहेत कि उघडपणे समोर आणू शकत नसल्याने त्याची तीव्रता आधीक वाढत जाऊन गंभीर होतो.त्या बाबत आपण कोणत्याहीडॉक्टरांकडे गेलात तर नि:संकोच पणे सांगावे जेणे करून वेळीच उपचार घेऊन त्यावर मात करू शकतो. उदा. (कॅन्सर) हा अतीशय गंभीर आजार कोणत्याही प्रकारचा असू शकतो तो वेळीच डिटेक्ट झाल्यास उपचारकरून रोखू शकतो. यासाठी वेळीच वैद्यकिय तपासणीकरून घ्यावीअसेआवाहन उपस्थीत रूग्णांना केले. या शिबिरात तपासणीझालेल्या रुग्णांपैकी विविध आजारांचे निदान करून जवळपास २५/३० रुग्णांना शस्त्रक्रीया करावी लागेल तर काहिंचा इलाज करून बरा होऊ शकतो असा सल्ला दिला.



# लोकलच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोकलच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना बेलापूर ते खारघर रेल्वे स्टेशन दरम्यान घडली आहे.

बेलापूर ते खारघर रेल्वे स्टेशन कि. मी. नं . – ३८/०९, ३८/१० जवळ अज्ञात लोकल ची ठोकर बसून एका इसमाचा मृत्यू झाला आहे. त्याचे अंदाजे वय ३५ वर्ष, उंची ५ फूट ४ इंच, अंगाने मध्यम, रंग काळा सावळा, चेहरा बारीक, नाक सरळ, दाढी – काळी वाढलेली आहे. अंगात निळ्या व पांढऱ्या रंगाचा पट्टया असलेला फुल शर्ट व निळ्या फिक्कट रंगाची जीन्स पँट घातलेली आहे . या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा सहा. पोलीस निरीक्षक ए . एस . कणसे यांच्या शी संपर्क साधावा.

# लोखंडी सळ्यांचा अपहार करणारे चार आरोपी गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लोखंडी सळ्यांचा अपहार करणारे चार आरोपीना गजाआड गुन्हे शाखा कक्ष –२ पनवेल च्या पथकाने गजाआड केले असून त्याच्या कडून चोरीचा माल हस्तगत केला आहे.

ट्रेलर ड्राइव्हर सुनील यादव ( वय २३ ) याच्या ताब्यात जवळपास ३६ लाख रुपये किमतीचा माल देण्यात आला होता. सदर माला पैकी ९६० किलो लोखंडी सळ्या ज्याची किंमत ६२४००/– रुपयांचा मालाचा सुनील यादव यांच्यासह आरोपी यार मोहंमद आस मोहंमद खान ( वय ३४), सचिन खोत ( वय ३७), व रुद्रप्रसाद मुरली चौधरी ( वय ५४ ) यांनी मजे करंजाडे गावचे हद्दीतील पळस्पे ते जेएनपीटी अश्या जाणाऱ्या नॅशनल हायवे क्रमांक ४ बी वरील निलेश ढाबा येथील मोक्या जागेत अपहार केला.

याबाबत ची तक्रार गुन्हे शाखा कक्ष –२ पनवेल येथे येताच वपोनि रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक वैभव रोंगे, पो–हवा. अनिल पाटील, तुकाराम सूर्यवंशी, राहुल पवार, अजित पाटील, दीपक डोंगरे व रुपेश पाटील आदींच्या पथकाने गुप्त बातमीदाराच्या माहिती नुसार व तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपींचा शोध घेऊन त्याच्या विरुद्ध कारवाई केली आहे.

## NOTICE

Notice is hereby given to all concerned that We, 1) Mohammad Shafi Mohammad Yusuf Patel, Residing at – Village Taloje, Post Taloja Pachnand, Tal-Panvel, Dist-Raigad, for self and as Power of Attorney Holder for Sr. No 2/1 to 2/6 and 3 to 10, 2/1) Mujamil Abdul Majid Patel, 2/2) Sarfaraz Abdul Majid Patel, 2/3) Shahanaz Abdul Majid Patel, 2/4) Tasmeen Begum Zulfikar Ali Mulla, 2/5) Shabina Zuber Patel, 2/6) Najiya Tausif Mulla, 3) Mhd. Amin Mohammad Yusuf Patel, 4) Abdul Wahab Mohammad Yusuf Patel, 5) Abdul Rashid Mohammad Yusuf Patel, 6) Riyaz Mohammad Yusuf Patel, 7) Khanam Shaukat Patel, 8) Shamina Ayub Namare, 9) Khadija Mhd. Amin Patel, and 10) Faimidabibi Mhd. Ayub Patel, Nos. 2/1 to 2/6, 3 to 10 all residing at – Village Taloje, Post Taloja Pachnand, Tal-Panvel, Dist-/Raigad, above No. 01 for self and as Power of Attorney Holder for Sr. No 2/1 to 2/6 and 3 to 10, Vide Power of Attorney dated 21/10/2022 appointed 1) Vishal Parnath Mhatre having address 37, Navade, Near Hanuman Mandir, Valavali, Pale Budruk, Tal-Panvel, Dist-Raigad and 2) Samadhan Dattaray Cheke having address : Room NO. 73, Near Marathi School, Nangangaon, Saramb, Buldhana – 443 206 for purposes of to look after our personal properties, family properties and many other purposes which is more particularly set out in the said Power of Attorney dated 21/10/2022.

We do hereby state and declare that the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke have not done any acts pursuant to the aforesaid Power of Attorney.

We do hereby state and declare that, we have revoked, cancelled and terminated the said Power of Attorney dated 21/10/2022 executed by us in favour of the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke by executing appropriate Deed of Revocation dated 13/12/2022, We have already informed to said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke by letter to which the Deed of Revocations is annexed. We do hereby state that, we have absolutely and completely revoked all powers or authority there under given to him to all intents and purposes.

We do hereby state and declare that the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke has no concern with any of our personal properties and the properties in which my share involves. Any person/s dealing with the said 1) Vishal Parnath Mhatre and 2) Samadhan Dattaray Cheke may do so entirely at their risks as to the costs and consequences thereof and I shall not be responsible for the same in any manner whatsoever.

Dated this 13/12/2022

Sd/-
1) Mohammad Shafi Mohammad Yusuf Patel No. 01 for self and as Power of Attorney Holder for Sr. No 2/1 to 2/6 and 3 to 10
2/1) Mujamil Abdul Majid Patel
2/2) Sarfaraz Abdul Majid Patel
2/3) Shahanaz Abdul Majid Patel
2/4) Tasmeen Begum Julfikar Ali Mulla
2/5) Shabina Juber Patel
2/6) Najiya Tausif Mulla
3) Mhd. Amin Mohammad Yusuf Patel
4) Abdul Wahab Mohammad Yusuf Patel
5) Abdul Rashid Mohammad Yusuf Patel
6) Riyaz Mohammad Yusuf Patel
7) Khanam Shaukat Patel
8) Shamina Ayub Namare
9) Khadija Mhd. Amin Patel
10) Faimidabibi Mhd. Ayub Patel
Above Sr. No. 2/1 to 2/6 and 3 to 10 through its constituted Attorney Mohammad Shafi Mohammad Yusuf Patel

मा.गोडसे मॅडम

**प्रो.जमा. ६–२५** **अर्जदाराचे वकील ॲड.सागर गोंधळी**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर सो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१८१७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१६/०१/२०२३

१) कांचन रघुनाथ घरत
वय : ६३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.४७२, साई कृपा सीएचएस, रु.नं.१५,
२ रा मजला, क्रॉस रोड नं.३, बी.एम.सी.
शाळेच्या मागे, माहिम वेस्ट, मुंबई
२) राजन रघुनाथ घरत
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.रु.नं.३, नवरत्न सीएचएस, ४० बी
मोगल लेन, देवदर्शन बिल्डींग समोर,
माहिम वेस्ट, मुंबई
३) भारती सुहास कवळे
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी भारती रघुनाथ घरत
वय : ६९ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.ए ५०२, राज उमंग १ शिवल्लभ रोड,
अशोकवन सिटी बँकेसमोर, दहिसर पूर्व मुंबई
४) उमा रवींद्र चौलर मयत तर्फे वारस
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी उमा रघुनाथ घरत
४/१) अमित रवींद्र चौलर
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.२/२५, गोल्डन व्हॅली सी.एच.एस.
लिमिटेड सांताक्रुझ पुर्व मुंबई
४/२) श्वेता तेजस मोहनदास
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी श्वेता रवींद्र चौलर
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.ए–३४, ग्रीन फिल्ड कापड बाजार लेन
समोर राम मंदिर, माहिम, मुंबई अर्जदार

ज्याअर्थी कै.अलका रघुनाथ घरत मयत ही दि.२८/०४/२०२१ रोजी मौजे : क्रॉस लेन तिसरा, बालाजी हॉस्पिटल व्हिक्टोरिया आ.डी., भायखळा, मुंबई, जीआर. मुंबई येथे राहत होते. त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धानसर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ.नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १ | ११८ | १ | २–६१–९१<br>पो.ख. ०–१०–१०<br>२–७२–०१ | १७.८१ |
| २ | २१७ | ब | ००–७२–९०<br>पो.ख. ०–०७–००<br>०–७९–९० | १३.४० |
| ३ | १०६ | १ | १–३६–००<br>पो.ख. ०–०२–३०<br>१–३८–३० | १५.८१ |
| ४ | ६९ | | ०–३४–९० | ३.६९ |
| ५ | ५३ | २ | ०–४०–५० | ६.०० |
| ६ | ४ | १ | ०–६२–५०<br>पो.ख. ०–०५–३०<br>०–६७–८० | ८.७८ |
| ७ | ४४ | | ०–४८–००<br>पो.ख. ०–००–५०<br>०–४८–५० | ४.७४ |
| ८ | ११७ | | ०–०५–००<br>पो.ख. ०–०२–६०<br>०–०७–६० | ०.२५ |
| ९ | १२६ | | ०–३०–९०<br>पो.ख. ०–००–५०<br>०–३१–४० | ३.३१ |
| १० | २०३ | | ०–१९–७०<br>पो.ख. ०–०२–००<br>०–२१–७० | ३.२५ |

कै.अलका रघुनाथ घरत हिचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१४/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# ग्रामपंचायत कोल्हारे

**ता.कर्जत, जि.रायगड**

## जाहीर सूचना

दि.१४/१२/२०२२

ग्रामपंचायत कोल्हारे, ता.कर्जत, जि.रायगड हे ग्रामपंचायत कोल्हारे हद्दीतील ग्रामनिधी अंतर्गत पुढील विकासकामे करण्याकरिता सिलबंद निविदा मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम १% | निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख | निविदा उघडण्याची तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे धामोते येथे राजिप शाळा धामोते क्र.३ दुरुस्ती करणे | १५००००/– | १५००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २ | मौजे धामोते येथे बाळाराम पेरणे ते सुरेश विरले यांच्या घरापर्यंत अंतर्गत रस्ता तयार करणे | १५००००/– | १५००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ३ | मौजे धामोते येथील राजिप शाळा धामोते क्र.२ दुरुस्ती करणे | ३३५०००/– | ३३५०/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ४ | मौजे धामोते येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे | २०००००/– | २०००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ५ | मौजे कोल्हारे येथील स्मशानभूमी दुरुस्ती करणे | १७००००/– | १७००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ६ | मौजे धामोते येथील बस स्टॉप ब्रिज रेलिंग करणे | १०००००/– | १०००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ७ | मौजे धामोते येथील दिलीप पेरणे ते रमण डांगरे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे | १७००००/– | १७००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ८ | मौजे धामोते येथील दिलीप पेरणे ते रमण डांगरे यांच्या घरापर्यंत अंतर्गत गटार करणे | ४७००००/– | ४७००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ९ | मौजे कोल्हारे येथील राजिप शाळा कोल्हारे येथे वाढीव रुम बांधणे | १८००००/– | १८००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १० | मौजे कोल्हारे येथील ग्रामपंचायत कार्यालयाला टेरेसला ग्रील बसविणे | ७००००/– | ७००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| ११ | मौजे बोपेले येथील साई मंदिर ते कोल्हारे चारफाटा पर्यंत वाढीव स्ट्रीट लाईट पोल बसविणे | १४२२२८/– | १४२२/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १२ | मौजे बोपेले येथील साई मंदिर ते बोपले गाव पर्यंत वाढीव स्ट्रीट लाईट पोल बसविणे | १०६६७१/– | १०६६/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १३ | मौजे धामोते येथे पेशवाई रस्ता ते नेरळ कळंब रस्त्यापर्यंत वाढीव स्ट्रीट लाईट पोल बसविणे | ४९७७९८/– | ४९७७/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १४ | मौजे धामोते येथील साई मंदिर ते धामोते ब्रिज पर्यंत वाढीव स्ट्रीट लाईट पोल बसविणे | ६०४४७०/– | ६०४४/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १५ | मौजे धामोते येथील पी.एच.सी.ते पेशवाई रस्त्यापर्यंत वाढीव स्ट्रीट लाईट बसविणे | ३९११२७/– | ३९११/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १६ | मौजे कोल्हारे येथे साई मंदिर ते कोल्हारे चारफाटा स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/– | ७४९९/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १७ | मौजे धामोते येथे नेरळ कळंब रोड ते धामोते गाव स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/– | ७४९९/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १८ | मौजे बोपेले येथील साई मंदिर ते बोपेले गाव पर्यंत स्ट्रीट लाईट पोल बसविणे | ७४९९४८/– | ७४९९/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| १९ | मौजे धामोते येथे डिस्ककव्हर रिसॉर्ट ते शिवसेना शाखा पर्यंत स्ट्रीट लाईट बसविणे | ७४९९४८/– | ७४९९/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २० | मौजे धामोते येथे रमण डांगरे ते ओहळाकडे जाणाऱ्या मोरी पर्यंत आर. सी. सी. गटार करणे. | १५००००/– | १५००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २१ | मौजे धामोते येथे अंतर्गत गटार बांधकाम करणे | १३७०००/– | १३७०/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २२ | मौजे धामाते येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारक तयार करणे व सुशोभिकरण करणे | ६०००००/– | ६०००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |
| २३ | मौजे कोल्हारे येथे अंतर्गत गटार करणे | ३०००००/– | ३०००/– | २३/१२/२०२२ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) | २३/१२/२०२२ (दुपारी १२.०० वाजेपर्यंत) |

**अटी व शर्ती**

१) निविदा मिळणेकरिता दि.१५/१२/२०२२ ते २३/१२/२०२२ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.
२) अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दि.१५/१२/२०२२ ते २२/१२/२०२२ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ०३:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
३) भरलेल्या सिलबंद निविदा दि.२३/१२/२०२२ रोजी कार्यालयीन वेळेत सकाळी ११:०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.
४) आलेल्या निविदा दि.२३/१२/२०२२ रोजी दुपारी १२:०० वाजता समक्ष उघडण्यात येतील.
५) इसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत कोल्हारे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.
६) मंजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
७) सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.
८) निविदा पोस्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.
९) निविदा किंमत ना परतावा राहील.
१०) नियमाप्रमाणे आयकर भरावा लागेल.
११) अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केला जाईल.
१२) कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% जीएसटी, २% आयकर, १% कर्मचारी विमा, रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.
१३) निविदा मंजूर केल्यावर रु.१००/– चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदार देवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा.
१४) सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्ती प्रमाणे काम करण्याचे आहे.
१५) एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

**सही/–**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोल्हारे**
**ता.कर्जत, जि.रायगड**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोल्हारे**
**ता.कर्जत, जि.रायगड**

# संक्षिप्त...

## शेकापचे ज्येष्ठ ज्येष्ठ नेते कृष्णा बालोजी गिद्दी यांचे निधन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

रायगड जिल्हा परिषदेच्या मुरुड तालुक्यातील राजपूरी मतदार संघाचे माजी सदस्य, शेतकरी कामगार पक्षाचे एकनिष्ठ, बुजुर्ग, जुने जाणते व स्व.प्रभाकर तथा भाऊ पाटील, अॅड. दत्ता पाटील यांचे निष्ठावान व जवळचे सहकारी, रायगड जिल्हा मच्छीमार संघाचे माजी चेअरमन, श्री महालक्ष्मी मच्छीमार सहकारी सोसायटी- राजपूरीचे चेअरमन कृष्णा बालोजी गिद्दी (वय-९०) वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या पश्चात विवाहित सहा मुले, दोन मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक, मुरुड, श्रीवर्धन, म्हसळा कोळी समाजाचे अध्यक्षपदही त्यांनी भुषविले होते. प्रतिकुल परिस्थितीवर मात करून त्यांनी स्वतःचे कर्तृत्व सिद्ध केले होते. राजपूरी गाव अनेक वर्षे एकसंध ठेवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांचे पुत्र विजय गिद्दी हे रायगड जिल्हा सहकारी बँकेचे विद्यमान संचालक आहेत. स्नुषा निता विजय गिद्दी ह्या मुरुड तालुका पंचायत समितीच्या माजी सभापती आहेत. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी अनेक मान्यवरांनी त्यांच्या राजपूरीच्या निवासस्थानी हजेरी लावली होती. त्यांच्या अंत्ययात्रेलाही मोठी गर्दी झाली होती.

## कोलाड हायस्कूलचे आंबेवाडी येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

सुएसो चे द.ग.तटकरे माध्य.व ज्युनिअर कॉलेज कोलाडचे आंबेवाडी येथे हिवाळी श्रमसंस्कार शिबिर मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना(एनएएस) विभागाचे वतीने सात दिवसासाठी विशेष हिवाळी निवासी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबिराचे उद्घाटन सरपंच सुरेश महाबळे, उपसरपंच जगन्नाथ धनावडे, सदस्य ज्ञानेश्वरी लोखंडे, राष्ट्रवादी तालुका महिला अध्यक्ष प्रितम पाटील ,सामाजिक कार्यकर्ते राकेश लोखंडे ,मारुती लोखंडे ,शाळा समिती सदस्य बाळा महाबळे, प्राचार्य येरुणकर तसेच शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व गावातील ग्रामस्थ महिला मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे : मृदुला गडणीस

**दै.रायगड नगरी । कर्जत**

'महिलांच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचवणाऱ्या प्रथांचा त्याग करणे हे प्रत्येक नागरिकाचे मूलभूत कर्तव्य आहे. भारताच्या अनेक भागांमध्ये, विशेषत: ग्रामीण भागात, अजूनही पुरुष आणि स्त्रियांसाठी भिन्न समाजीकरण मानदंड आहेत. महिलांनी मृदुभाषी, शांत आणि शांत असणे अपेक्षित आहे. त्यांनी चालणे, बोलणे, बसणे आणि विशिष्ट पद्धतीने वागले पाहिजे. तर पुरुषांनी आत्मविश्वास, मोठ्या आवाजात आणि त्यांच्या इच्छेनुसार कोणतेही वर्तन प्रदर्शित केले पाहिजे. या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे अनेक सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात शिक्षणाची भूमिका महत्त्वाची आहे.' असे स्पष्ट प्रतिपादन लेखिका व संस्कृतच्या अभ्यासक मृदुला गडणीस यांनी येथे केले.

कोकण ज्ञानपीठ कर्जतच्या राहुल धारकर



फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने महिला तक्रारी आणि लैंगिक छळ निवारण समितीने 'पॉश कायदा २०१३' प्रभावीपणे लागू करण्यासाठी महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. समारंभाचे उदघाटन लेखिका व संस्कृत विषयाच्या गाढ्या अभ्यासक मृदुला गडणीस यांच्या हस्ते सरस्वती पूजन करून करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, व्यक्ती विकासचे व्याख्याते नितीन पाटील, डॉ. भरत टेकाडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्राचार्य डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रास्ताविकात महाविद्यालयाचा चढता आलेख सादर केला.

गडणीस यांनी आपल्या मार्गदर्शनपर मनोगतात, 'तरुणाई त्यांच्या घरातच पुरुष प्रधान संस्कृती पहात आहेत जी हळूहळू जमा होत आहे आणि एक मोठी सामाजिक समस्या बनत आहे. एखादा मुलगा दोन वेळा नापास झाला तरी त्याला पुन्हा शिकण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्याउलट एखादी मुलगी एकदा जरी नापास झाली की तिला घरी बसवून तिचे लवकर लग्न करून दिले जाते. हे बदलायचे असेल तर घरातील वातावरण बदलायला हवे. आपण त्यांना सोशल मीडियावर कमीत कमी वेळ घालवण्यासाठी आणि कुटुंब आणि मित्रांसोबत दर्जेदार वेळ घालवण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे. त्यांना वाचनाची सवय सुधारण्याची गरज आहे. महान नेत्यांच्या जीवनावर आणि विचारांवर आधारित पुस्तके वाचणे त्यांना प्रेरणादायी ठरू शकते. हे त्यांना जीवनात शॉर्टकट घेण्याऐवजी सखोल शिकणारे आणि कठोर परिश्रम करणारे बनवणार आहे. योग्य शिक्षणा सोबतच सामाजिक भान, कुटुंबातील साक्षरता, नैतिकता, अध्यात्म, पवित्रता, योग्य विचार आणि योग्य आचरण महिलांवरील भेदभाव आणि हिंसाचार रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. तसेच विद्यार्थ्यांनी वाचन आणि प्रवास यावर भर दिला ज्यामुळे लोकांना समजण्यास मदत होईल आणि आपली विचार प्रक्रिया बदलण्यास मदत होईल.' असे सांगितले. सूत्र संचालन प्रा. ज्योती लहाने यांनी केले. या प्रसंगी प्रा. मनीषा चौधरी, प्रा. अमोल बोराडे, प्रा. तनिष्का ठाकरे, रेवती देशपांडे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मागील चार दिवसांपासून श्रीवर्धनमध्ये जिओचे नेटवर्क गायब

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील चार ते पाच दिवसांपासून श्रीवर्धन परिसरामध्ये जिओ मोबाईलचे नेटवर्क वारंवार गायब होत असल्यामुळे ग्राहकांमधून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे. काही वर्षांपूर्वी श्रीवर्धन शहरामध्ये फक्त आयडिया आणि वोडाफोन, बीएसएनएल इत्यादी नेटवर्क उपलब्ध होते. परंतु रिलायन्स जिओने आपली मोबाईल सेवा सुरू केल्यानंतर श्रीवर्धन मधील ग्राहकांना अत्यंत चांगली सेवा मिळू लागली होती. जिओ मोबाईलची फोरजी सेवा सुरू झाल्यानंतर अनेक ग्राहकांनी आपले मोबाईल बदलून जिओ कंपनी वरती पोर्ट केले होते. श्रीवर्धन शहरासह परिसरातील बहुतांश भागांमध्ये जिओचे नेटवर्क चांगले चालत असल्याने अनेक नेटकऱ्यांना देखील नेट वापरणे सोयीचे झाले होते. विविध बँकांमधील नेटवर्क खराब झाल्यानंतर देखील जिओच्या नेटवर्क वरती बँकांचे कामकाज चालू राहत होते. मात्र मागील चार-पाच दिवसांपासून जिओ मोबाईलचे नेटवर्क वारंवार गायब होत असून, दिवसातून आठ ते दहा तास तसेच चार ते पाच तास नेटवर्क बंद राहत आहे. त्यामुळे जिओचे सिम वापरणाऱ्या ग्राहकांमधून संताप व्यक्त केला जात आहे. जर जिओ मोबाईल कंपनीने आपल्या सेवेमध्ये सुधारणा केली नाही. तर जिओच्या ग्राहकांकडून अन्य मोबाईल कंपनीचा पर्याय शोधण्याची तयारी सुरू झाल्याचे विश्वसनीय वृत्त आहे.

# जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून जिल्हा प्रशासनामार्फत कबड्डी चषक स्पर्धेचे उत्साहात आयोजन

### आपली माती-आपला खेळ, ले पंगा-खेल कबड्डी घोषणांनी दुमदुमले पीएनपी महाविद्यालयाचे मैदान

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली बुधवार, दि. १४ डिसेंबर २०२२ रोजी पी.एन.पी. महाविद्यालय, वेश्वी, अलिबाग येथील क्रीडांगणावर रायगड जिल्हा प्रशासनाने आयोजित आणि रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन यांच्या तांत्रिक सहकार्याने कबड्डी चषक स्पर्धा संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह ड. आस्वाद पाटील, श्रीमती चित्र-लेखा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत ज्येष्ठ राष्ट्रीय कबड्डीपट्टू श्री.दिलीप धुमाळ, राष्ट्रीय युवा पुरस्कारार्थी तपस्वी गोंधळी यांच्या हस्ते मैदानावर श्रीफळ वाढवून संपन्न झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, उपजिल्हाधिकारी (सा.प्र.) सर्जे राव मस्के-पाटील, अलिबाग प्रांताधिकारी प्रशांत ढगे, जिल्हा प्रशासन अधिकारी श्याम पोशट्टी, तहसिलदार विशाल दौंडकर, पीएनपी महाविद्यालयाचे संचालक विक्रांत वार्डे, सीईओ संजय मिरजी, प्राचार्य डॉ.ओंकार पोटे, जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक, सहाय्यक जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन निकम, रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनचे कार्याध्यक्ष प्रसाद भोईर, उपाध्यक्ष संजय पाटील, ज्येष्ठ पत्रकार राहुल वाघमारे, तांत्रिक समिती प्रमुख जनार्दन पाटील, अलिबाग तालुका क्रीडा समन्वयक रमेश भगत यांची उपस्थिती होती.

स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ.महेंद्र कल्याणकर म्हणाले की, रायगड जिल्ह्यात अनेक उत्तमोत्तम खेळाडू आ-हेत, भविष्यात अनेक खेळाडू घडतील, यासाठी जिल्हा प्रशासन देखील प्रयत्नशील राहील. खे-ळाडू आणि शासकीय अधिकारी, नागरिक यांचे जिव्हाळ्याचे नाते टिकविण्यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने या कबड्डी स्पर्धेच्या माध्यमातून एक सुरुवात केली आहे. हे नाते अधिक वृध्दींगत व्हावे, यासाठी यापुढेही अशा प्रकारच्या स्पर्धा जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून नेहमीच भरविण्यात येतील. त्याकरिता जिल्हा प्रशासन खेळाडूंना, पदाधिकाऱ्यांना सर्वोतोपरी सहकार्य करील. शेवटी ही स्पर्धा आयोजित करण्यासाठी पी.एन.पी. महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने केलेल्या सहकार्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी त्यांचे विशेष आभार मानले.

ड.आस्वाद पाटील हे मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, जिल्हा प्रशासनाने रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या सहकार्याने अशा प्रकारची कबड्डी स्पर्धा आयोजित करण्याची ही पहिलीच वेळ आहे. नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचा अनुभव सांगताना त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत सहभागी पदाधिकारी व खेळाडूंना उपलब्ध करुन दिलेल्या उत्कृष्ट सोयी-सुविधांचा आवर्जून उल्लेख केला. जगभरात कबड्डी हा खेळ अतिशय लोकप्रिय होत आहे.या खेळाडूंच्या पाठीवर जिल्हाधिकारी डॉ.कल्याणकर यांनी दिलेली कौतुकाची थाप अधिक मोलाची आहे, असे सांगून भविष्यात या खेळाला अधिक चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास त्यांनी शेवटी व्यक्त केला तसेच अशा प्रकारच्या स्पर्धा आयोजनात पुढाकार घेतल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर आणि संपूर्ण जिल्हा प्रशासनास मन:पूर्वक धन्यवाद दिले.

या कबड्डी चषक स्पर्धेत रायगड जिल्हा वरिष्ठ गट कबड्डी निवड चाचणी स्पर्धेतील प्रथम १६ पुरुष संघ आणि प्रथम ८ महिला संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेतील प्रावीण्य प्राप्त संघांना (प्रथम, द्वितीय आणि तृतीय) चषक, प्रमाणपत्र आणि रोख पारितोषिक(प्रथम-३१ हजार, द्वितीय-२१ हजार, आणि तृतीय-११ हजार) देण्यात येणार आहे.

या स्पर्धेसाठी अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालयाकडून जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या सहकार्याने डॉ.आशिष मिश्रा व डॉ.अजित बरगे यांच्यासह वैद्यकीय पथक मैदानावर तैनात करण्यात आले होते. या कबड्डी स्पर्धा उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचलन जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा क्रीडा अधिकारी रविंद्र नाईक यांनी केले.

# उरण चारफाटा येथील जाहिरात फलक हटविल्याने चौकाने घेतला मोकळा श्वास

**दै.रायगड नगरी । उरण**

अपघाताला कारणीभूत ठरणारे चारफाट्यावर लावण्यात आलेले जाहिरातीचे फलक हटविण्यात आ-लेआहेत.त्यामुळे या चौकाने पुन्हा एकदा मोकळा श्वास घेतला आहे. सिडको कडून तयार करण्यात आलेल्या चौकात विविध प्रकारचे मोठं मोठे फलक लावण्यात येत होते. या फलकामुळे वाहन चालकांना समोरील वाहने दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता होती.

त्यामुळे उरणच्या चौकातील अपघाताला कारणीभूत ठरणारे फलक हटविण्याची मागणी करण्यात आली होती. या चौकात वाहतूक कोंडी होत असल्याने येथील नागरिक त्रस्त झाले होते.

त्यामुळे वारंवार मागणी केल्यानंतरही सिडकोने उरणच्या चारफाटा येथील



चौकाचे रुंदीकरण केले आहे. त्यामुळे वाहनचालक व नागरिकांनाही दिलासा मिळाला आहे.

मात्र या चौकात जाहिरातींचे मोठं मोठे फलक लावले जात आहेत. त्यामुळे अचानक वाहने एकमेकांसमोर येतात आणि अपघात होतो. त्यामुळे अशा प्रकारच्या फलकांवर सिडकोने कारवाई करण्याची मागणी वाहनचालकाकडून करण्यात आली होती. उरणच्या चारफाटा येथील चौकातील फलक हटविल्याने वाहन चालकांना सतावणारी समस्या दूर झाली असल्याचे मत निरंजन राऊत यांनी व्यक्त केले आहे.

# कोरोनाचा प्रादुर्भाव संपल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात शालेय व महाविद्यालयीन सहलींच्या संख्येत लक्षणीय वाढ

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

दोन वर्ष देशासह संपूर्ण जगभरामध्ये कोरोना महामारीने थैमान घातले होते. यावेळी कोणत्याही प्रकारची गर्दी जमवण्यासाठी किंवा अनेक माणसांनी एकत्र येण्यासाठी निर्बंध घालण्यात आलेले होते.

त्यामुळे शाळा तसेच महाविद्यालयांच्या शैक्षणिक सहली बंद ठेवण्यात आल्या होत्या. परंतु आता कोरोना महामारीचा प्रादुर्भाव संपल्यामुळे शालेय व महाविद्यालयीन शैक्षणिक सहलींच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे पहायला मिळत आहे.

राज्याच्या विविध भागांमधून एसटी बसेस अथवा खाजगी बसेस घेऊन अनेक शाळा त्याचप्रमाणे महाविद्यालयांचे विद्यार्थी व शिक्षक शैक्षणिक सहली घेऊन श्रीवर्धन तालुक्याला भेटी देत आहेत. श्रीवर्धन येथील स्वच्छ व सुंदर समुद्रकिनारा, त्याचप्रमाणे निसर्गरम्य ठिकाणे, श्रीक्षेत्र हरिहरेश्वर व दिवेआगर येथील सुवर्ण गणेश मंदिर पाहण्यासाठी शैक्षणिक सहलीच्या निमित्ताने अनेक विद्यार्थी व विद्यार्थिनी या ठिकाणी येत आहेत. एका शाळेच्या किंवा महाविद्यालयाच्या सहलीच्या चार ते पाच गाड्या एक सोबत येत असल्याने श्रीवर्धन शहरातील अरुंद रस्त्यावरती वाहतूक कोंडी झाल्याचे देखील पाहायला मिळत आहे. या अगोदर येणाऱ्या सहली विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय श्रीवर्धन या ठिकाणी कोणत्या ना कोणत्या हॉटेलमध्ये किंवा केटरिंग वाल्याकडे आगाऊ करून ठेवत असत.

परंतु सध्या या गोष्टीचा ट्रेंड बदललेला पाहायला मिळतो. अनेक शाळांचे शिक्षक सोबत आचारी तसेच जेवण बनवण्याचे साहित्य घेऊन सहल आयोजित करत असल्याचे पाहायला मिळत आहे. श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याजवळ मठाच्या स्मशानभूमी जवळ अवधूताचे मंदिर आहे. या ठिकाणी डांबरीकरण केलेले खूप मोठे मैदान अस्तित्वात आहे.

मात्र या मैदानामध्ये दशक्रिया विधी त्याचप्रमाणे पिंडदान इत्यादी उत्तर कार्यासाठी हे मैदान राखीव असताना देखील अनेक सहलीच्या गाड्या या ठिकाणी उभ्या करून ठेवल्या जातात.

तसेच सहल घेऊन आलेल्या आयोजकांकडून या ठिकाणी जेवण बनविण्याचे उद्योग देखील सुरू असल्याचे दिसून येते. तरी श्रीवर्धन नगर परिषदेने या ठिकाणी सूचना फलक लावून सदर जागेमध्ये गाड्या पार्किंग करणे व जेवण बनवण्यास मज्जाव करावा. अशी मागणी श्रीवर्धन शहरातील नागरिकांकडून केली जात आहे.

## तीव्र वळणावर २५ टन साखर घेऊन जाणारा ट्रक पलटी



**दै.रायगड नगरी । म्हसळा**

पुणे-दिघी F753 या राष्ट्रीय मार्गावरील माणगाव - म्हसळा या रस्त्यावर घोणसे घाटातील केळेवाडी येथील तीव्र उतार आणि घोकदायक वळणावर आज मंगळवार दिं.१३ रोजी दुपारी१.३० चे दरम्यान MH-12FZ 7035 ह्या ट्रकला अपघात झाला, अपघातात ड्रायव्हर जखमी झाला,सदर साखर रोहा रेल्वे स्टेशन येथून दिघी बंदर मार्फत अन्य देशांत निर्यात होणार होती.

घाटाचे माणगाव बाजूने वेगाने आलेला ट्रक चालकाने नियंत्रण करण्या करीता उजवीकडे वळविला असता तो उंच माल आसल्याने जागेवरच पलटी झाला असावा असा जाणकारांचा अंदाज आहे. सदर अपघातात प्रदीप काळोखे, या चालकाचे डोक्याला मार लागल्याने म्हसळा ग्रामिण रुग्णालयांत त्याच्यावर उपचार करून पुढे पाठविला आहे. दुपारी १.३० ला अपघात झाला परंतु सायंकाळी ७वा.पर्यंत अपघाताची नोंद करण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले.

# मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयातर्फे नवीवाडी-शिघ्रे येथे एन.एस.एस.चे शिबीर

### दि.१७ डिसेंबर रोजी सरपंच संतोष पाटील यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या वसंतराव नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्तविद्यमाने शनिवार दि.१७डिसेंबर ते शुक्रवार दि.२३डिसेंबर २०२२ या कालावधीत भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत युवकांचा ध्यास ग्राम -शहर विकास हे ब्रिद घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबीर नवीवाडी-शिघ्रे येथे आयोजित करण्यात आले असून प्राचार्य डॉ.एम.ए.नगरबावडी यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सरपंच संतोष पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उदघाटन होणार आहे.

नवीवाडी-शिघ्रे येथे शनिवार दि.१७ डिसेंबर रोजी होणाऱ्या या उदघाटन प्रसंगी मुरुड तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, महाविद्यालय विकास समिती सदस्य तथा कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष सुभाष महाडिक,सदस्या वासंती उमरोटकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहूल अतिग्रे, बाळकृष्ण मिसाळ, उपसरपंच महेंद्र दिवेकर, मुस्लिम समाज अध्यक्ष डॉ.निसार बिरवाडकर रा.जि.प.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवप्रसाद शेडगे,शाळा व्यवस्थापक संतोष माळी, उर्दू शाळा मुख्याध्यापक नाजमा सैय्यद आदी. मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. एम.ए.नगरबावडी, उपप्राचार्य विश्वास चव्हाण, रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे, प्रा.डॉ.जी.डी.मुनेश्वर, प्रतिनिधी कु.मंदार सावंत कु.संदीप बोरले, कुमारी स्नेहा चव्हाण, कुमारी गौरी विरकुड, कुमारी सृष्टी पाटील, कुमारी वैष्णवी राजपूरकर, कुमारी रिया माने, कुमारी साक्षी नांदिवकर तसेच रा.स.योजना समिती सदस्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, गटप्रमुख रा.स.यो. व सर्व शिबिरार्थी यांच्यावतीने निमंत्रणाद्वारे कळविण्यात आले आहे.

## साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात श्री साईबाबांची भक्ती करणारा, साईबाबांना मानणारा खूप मोठा वर्ग असून उरण मधील अनेक प्रसिद्ध मंदिरापैकी खोपटे येथील श्री साईबाबा मंदिर प्रसिद्ध आहे.या मंदिराचा ५ वा वर्धापन दिन दि.१३/१२/२०२२ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी भाविक भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सकाळी काकडा आरती,मंगळ स्नान,होम हवन नवग्रह पुजन, रूद्र पुजन, कुळदैवत, भवानी पुजन, श्री सत्यनारायण पुजा, श्री साईबाबा मध्यान आरती नंतर साई भंडारा महाप्रसाद चालू झाला तो रात्री ११वाजेपर्यत चालुच होता. संध्याकाळी ५ वाजता श्री गोपाळ काका हरीपाठ मंडळाचा हरीपाठ कार्यक्रम, सायंकाळी ७ वाजता श्री साईबाबा ची सांज आरती,आठ वाजता वडग्रुप प्रस्तुत साईगितांचा भक्तीमय गायन कार्यक्रम संपन्न झाला. सदर धार्मिक कार्यक्रम, वर्धापन साजरा करण्यासाठी डाकी कुटुंब, श्री साई सेवक मंडळ खोपटे, नवतरुण गणेश नवरात्रौत्सव मंडळ, पूर्व विभाग साई सेवक, ग्रामस्थ मंडळ खोपटे-बांधपाडा, साईसेवक व मित्र परिवार आदींनी विशेष मेहनत घेतली.

